# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-22.06.2026** **वार- सोमवार**

---

**निवडणूक निकाल**

राज्य विधानपरिषदेच्या अकरा जागांसाठी झालेल्या निवडणुकीचे निकाल आज जाहीर झाले. अकरापैकी दहा जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी झाले आहेत, तर नाशिकच्या एका जागेवर अपक्ष उमेदवाराला विजय मिळाला. सहा जागांवर महायुतीच्या उमेदवारांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींद्वारे निवडल्या जाणाऱ्या विधानपरिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीत १७ पैकी १६ जागा जिंकत महायुतीने दणदणीत विजय मिळवला आहे. महाविकास आघाडीला एकही जागा जिंकता आली नाही.

**अधिवेशन**

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला आज मुंबईत सुरुवात झाली. सुरवातीला विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी नवनिर्वाचित सदस्य सुनेत्रा पवार आणि अक्षय कर्डिले यांना सदस्यत्वाची शपथ दिली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०२६-२७ साठीच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. अल निनोच्या प्रभावामुळे नैऋत्य मान्सून पावसाला विलंब झाल्यानं राज्याच्या विविध भागांत पाणीटंचाई निर्माण झाल्याचा मुद्दा काँग्रेस नेते नाना पटोले यांनी सभागृहात उपस्थित केला. त्यावर योग्य चर्चा घडवून आणायचं आश्वासन अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिलं.

दिवंगत आशा भोसले, सुमन कल्याणपूर, यांच्यासह सभागृहाच्या सदस्यांना सभागृहाने श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

तत्पूर्वी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी आज एकंदर ९७ हजार ७०६ कोटी ४० लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर सादर करण्यात आल्या. यात सर्वाधिक, २० हजार ५५२ कोटी रुपयांची तरतूद पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी करण्यात आली आहे. त्याखालोखाल १० हजार ७ कोटी १० लाख रुपयांची तरतूद केंद्र शासनाकडून राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजनेअंतर्गत बिनव्याजी कर्जासाठी केली आहे. विकसित भारत जी-राम-जी योजनेसाठी केंद्र आणि राज्याचा हिस्सा ७ हजार ३६७ कोटी ३२ लाख रुपये इतका आहे, तर सिंहस्थ कुंभमेळ्याचं नियोजन आणि अंमलबजावणीसाठी ३ हजार कोटी रुपयांच्या निधीची तरतूद आहे.

**एकल महिला**

एकल महिलांच्या सक्षमीकरणासाठी शासनातर्फे 'स्वतंत्र एकल महिला धोरण' तयार केलं जात आहे. तसंच २३ जून हा एकल महिला दिवस म्हणून साजरा केला जातो, त्या अनुषंगाने पुणे जिल्हा महिला आणि बाल विकास अधिकारी कार्यालयानं उद्या कार्यशाळा आयोजित केली आहे.

यात रोजगारांच्या संधी, मालमत्तेचा हक्क, अपत्यांचे शिक्षण, शासकीय योजना, कायदेशीर अडचणी या संदर्भातील सूचना लेखी स्वरुपात सादर करता येणार आहेत. त्यामुळे या विषयावर काम करणाऱ्या व्यक्ती, संस्था

आणि संबंधित तज्ज्ञांनी कार्यशाळेला उपस्थित राहावं असं आवाहन, जिल्हा महिला आणि बाल विकास अधिकारी रोहिणी ढवळे यांनी केलं आहे.

**Pcmc**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ‘शून्य कचरा संकलन’ उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. गेल्या महिनाभरात ११ टनांहून अधिक कचऱ्याचं विलगीकरण करण्यात आलं आहे. या उपक्रमात १९ हजार ८०० घरांनी भाग घेतला. गेल्या महिनाभरात जवळ जवळ १० टन ओला कचरा आणि दीड टन सुका कचरा, स्वतंत्रपणे संकलित करण्यात आला. याशिवाय, ६४३ किलो सॅनिटरी कचऱ्याचं सुरक्षित पद्धतीने व्यवस्थापन करण्यात आलं असल्याचं महापालिकेनं म्हटलं आहे.

**रक्तदान**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाय.सी.एम. रुग्णालयाच्या सहकार्याने नुकतंच रक्तदान शिबीर घेण्यात आलं. या शिबिरात पिंपरी औद्योगिक वसाहतीतील श्रीटिकेल कंपनीच्या २७५ कर्मचाऱ्यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत रक्तदान केलं.

**योगविक्रम**

बाराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सतर्फे काल पुण्यात ‘सूर्यभारत सूर-संगम पीसॅथॉन  या अभिनव उपक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. या उपक्रमात २ हजारहून अधिक विद्यार्थी आणि शिक्षक, साधक, प्रत्यक्ष आणि ऑनलाइन माध्यमातून सहभागी झाले. मराठी, संस्कृतसह विविध 21 भारतीय भाषांमधून या योगसत्रांचं संचालन, हेच यंदाच्या उपक्रमाचं मुख्य आकर्षण ठरलं. भारताच्या भाषिक आणि सांस्कृतिक वैविध्याचं दर्शन घडवणाऱ्या या उपक्रमाने ‘अनेक भाषा, एक श्वास आणि एकच शांततेचा संदेश’ ही संकल्पना प्रभावीपणे मांडत विक्रमाची नोंद केली.

**श्रीरंगबारणे**

पिंपरी-चिंचवडमध्ये गेल्या काही दिवसांपासून पाणी कपात करण्यात येत असून विस्कळीत पाणीपुरवठ्याच्या तक्रारींमध्ये वाढ झाली आहे, त्या पार्श्वभूमीवर खासदार श्रीरंग बारणे यांनी आज महापालिका अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेतली. पाणी कपातीमुळे टँकरने करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठ्याचं प्रमाण वाढलं आहे, या टँकर चालकांची नोंद ठेवावी, तसंच स्वच्छ पाणी न दिल्यास टँकर चालकांवर कारवाई करावी अशी सूचना बारणे यांनी महापालिका प्रशासनाला केली.

**हवामान**

नैऋत्य मोसमी पावसानं आज कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राच्या पुढच्या काही भागापर्यंत मजल मारली. पुणे जिल्ह्याच्या काही भागात मान्सून सक्रीय झाला आहे. पुण्यात काल दुपारी जोरदार पाऊस पडला; आज शहरत अंशतः ढगाळ वातावरण होतं, उद्या विजांसह पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत.  उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**